सं.फौ.ख.क्र. ५४६/२०२१
शासन वि. जुबेर
निशाणी क्र. २ वर पुढे

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची शपथेवर जबाणी**

**माझे नाव :** अलका अशोक थोरात,
**वय :** ५९ वर्षे, **धंदा -** काही नाही,
**राहणार :** हसनापूर, ता. राहाता, जि. अहमदनगर.

सरतपासणी

**(सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. पी. नागरे )**

राहुल माझा मुलगा होता. सन २०२१ मध्ये तो लाईटींगचे काम करत होता. त्याचा अपघात एवढेच मला माहिती आहे, बाकी काय झाले मला माहित नाही. अपघात कधी झाला हे मला सांगता येणार नाही. अपघाताची माहिती मला पोलीसांनी दिली. मी फिर्याद दिली नाही. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर अंगठा माझा आहे. त्यात लिहिलेला मजकुर मला आता वाचून दाखविण्यात आला. तसा मजकुर मी पोलीसांना सांगितला नव्हता. अंगठ्याच्या हद्दीपर्यंत **निशाणी क्रमांक ७** देण्यात आला.

**(साक्षीदार सरकार पक्षास मदत करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांना सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. सहायक अभियोक्ता यांना सुचक प्रश्न विचारणयची परवानगी देण्यात आली.)**

**२.** दिनांक ०१/०१/२०२१ रोजी माझा मुलगा राहुल हा त्याच्या मोटारसायकल क्र. एमएच १७ ए.वाय. २०८८ द्वारे कोठे गेला हे मला माहित नाही. तसेच त्याने मला त्याबद्दल काही सांगितले देखील नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०१/०१/२०२१ रोजी मी पीएमटी लोणी येथे गेले तेव्हा माझा मुलगा मयत असल्याचे मी पाहिले. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १४/०१/२०२१ रोजी मी कोल्हार -लोणी रस्त्यावर नाशिक पुलाजवळ मुलाच्या अपघाताबद्दल चौकशी करायला गेले. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी गेल्यानंतर मला सुनिल घोगरे नावाच्या

व्यक्तीने अपघात पाहिल्याचे समजले. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताबाबत माहिती झाल्यानंतर मी फिर्याद द्यायला गेले. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस ठाणेत जावून टाटा मॅजिक एम.एच. १७ ए. झेड ६४२२ चा चालकाविरूद्ध फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादमधील मजकूर मी पोलीसांना सांगितला. पोलीसांनी तो मजकूर का लिहिला मला कारण सांगता येणार नाही. आरोपीला मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास – संपूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. पी. डी. बेंद्रे यांनी नाकारला.**
**उलटतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

SANTOSH RAMAKANT BHARAD
Digitally signed by SANTOSH RAMAKANT BHARAD
Date: 2026.03.18 11:50:07 +0530

( संतोष र.भरड )

दिनांक १७/०३/२०२६

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, राहाता.
न्यायालय क्र.२